# तळकोकणातील महिला नेतृत्वाची चिकित्सा

**लक्ष्मण दादासो भोगम** राज्यशास्त्र अधिविभाग शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

.............................................................................................................................................

**प्रस्तावना**

भारतासह महाराष्ट्राचे राजकारण हे प्रभुत्वशाली जातकेंद्रीत व पुरुषकेंद्रीत राहिलेले आहे. त्याचबरोबर ते सामाजिक व आर्थिक हितसंबंधांनी देखील प्रभावित राहिलेले आहे. त्यामुळे प्रस्थापित राजकीय व्यवस्थेला जातीव्यवस्था, पितृसत्ताक व्यवस्था व अर्थसत्ता या प्रमुख तीन व्यवस्थांसोबत समायोजन करावे लागते. राजकीय क्षेत्रांबरोबरच सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक व धार्मिक यांसारख्या समाजाच्या विविध क्षेत्रांमधील निर्णय प्रक्रियेत सहभाग घेणे आणि निवडणुका लढविणे वगैरे जणू पुरुषांचे कार्य आहे. सबब, स्त्रीयांनी या क्षेत्रापासून दूर राहिले पाहिजे, अशी पुरुषसत्ताक व पुरुषकेंद्रीत मानसिकता येथील राजकीय पक्षांच्या नेतृत्वांची राहिलेली आहे. राजकीय क्षेत्रातील महिलांच्या समावेशनाच्या संदर्भात बोलायचे झाले तर, महिलांचा राजकीय सहभाग म्हणजे मोर्चे, आंदोलने, राजकीय पक्षांची महिला आघाडी, हळदी कुंकू यासारखे उपक्रम आणि मतदान करणे या सिमीत अर्थाने मर्यादित केलेला आहे.

**तळकोकणातील महिला नेतृत्व**

महाराष्ट्र विधानसभा पातळीवर राजकीय सहभागाच्या संदर्भात महिला या सामाजिक घटकाला दुय्यम स्थान दिले गेलेले आहे. १९६२ ते २०१४ या कालावधीमध्ये झालेल्या बारा विधानसभा निवडणुकांमध्ये महिलांना राजकीय क्षेत्रातून वगळण्याची प्रक्रिया घडलेली आहे. महाराष्ट्र विधानसभेमध्ये १९६२ ते २०१४ या कालावधीत निवडून गेलेल्या एकूण ३३८९ सदस्यांपैकी ३२५२ पुरुष सदस्य, तर केवळ १३७ महिला सदस्य निवडून गेलेल्या आहेत. याचा अर्थ ९५.९५ टक्के पुरुष तर केवळ ४.०४ टक्के महिलांनी महाराष्ट्र विधानसभेमध्ये नेतृत्व केले. यावरुन असे म्हणता येईल की, महाराष्ट्र विधानसभा पातळीवर महिलांना राजकीय हक्क, राजकीय सहभाग आणि राजकीय प्रतिनिधीत्वाची संधी नाकारलेली आहे.

महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीनंतर १९६२ ते २०१४ या कालावधीत झालेल्या विधानसभेच्या निवडणुकांमध्ये तळकोकणातील संगमेश्वर, रत्नागिरी, देवगड, दापोली, खेड, सावंतवाडी, वेंगुर्ला, गुहागर, चिपळुण, व कुडाळ या विधानसभा मतदारसंघातून महिला नेतृत्वांनी निवडणुकीच्या प्रक्रियेत सहभाग नोंदविला. सदर मतदारसंघातून महिला नेतृत्व विधानसभा पातळीवरील निवडणुकीय राजकारणामध्ये सहभागी झाले. पुरुष नेतृत्वाच्या तुलनेत महिला नेतृत्वांचा राजकीय सहभाग अत्यल्प असला तरीदेखिल तो महत्वाचा आहे. कॉंग्रेस, भाजपा, शिवसेना, जनता पक्ष, जनता दल, अखिल भारतीय हिंदु महासभा अशा विविध राजकीय पक्षांच्या माध्यमातून तळकोकणातील महिला नेतृत्व निवडणुकीय राजकारणात सहभागी झाले. १९९० नंतरच्या काळात राजकीय पक्षांनी ज्या महिला नेतृत्वांना उमेदवारी नाकारली, त्या महिला नेतृत्वांनी राजकीय पक्षांच्या विरोधात जाऊन राजकीय पक्षांच्या अधिकृत उमेदवाराच्या विरोधात अपक्ष म्हणून देखिल निवडणुक लढविली. महिला नेतृत्वांनी अपक्ष म्हणून निवडणूक लढविताना त्या विजयी झाल्या नाहीत. तरीदेखिल त्यांनी राजकीय हस्तक्षेपाची केलेली कृती महत्वाची ठरते.

**तक्ता क्र. १.**

**१९६२ ते २०१४ तळकोकणातून विधानसभा निवडणूक लढविणाऱ्या महिला उमेदवारांचे पक्षनिहाय वर्गीकरण**

| अ. क्र. | राजकीय पक्ष | महिला उमेदवारांची संख्या | विजयी महिला उमेदवार |
|---|---|---|---|
| १ | कॉंग्रेस | ०७ | ०२ |
| २ | भाजपा | ०१ | ०१ |
| ३ | शिवसेना | ०१ | — |
| ४ | जनता पक्ष | ०१ | ०१ |
| ५ | जनता दल | ०२ | — |
| ६ | अखिल भारतीय हिंदू सभा | ०३ | — |
| ७ | अपक्ष | ०६ | — |
| | एकुण | २१ | ०४ |

स्त्रोत:www.eci.gov.in

तक्ता क्र. १ वरुन असे दिसून येते की, १९६० ते २०१४ या कालावधीत तळकोकणाच्या विधानसभा निवडणुकीच्या राजकारणामध्ये केवळ २१ महिला उमेदवारांना राजकीय प्रक्रियेत समावेशनांची संधी प्राप्त झाली. यामध्ये काँग्रेस पक्षाकडून सर्वात जास्त महिला उमेदवारास संधी दिल्याचे दिसून येते. एकुण २१ महिला उमेदवारांपैकी ०७ महिलांना काँग्रेस पक्षाने उमेदवारी दिलेली दिसते. परंतु, त्यापैकी केवळ दोन महिला उमेदवार विजयी झालेल्या दिसतात. १९६७ ते २०१४ या कालावधीत तळकोकण विभागातून ४ महिला उमेदवार महाराष्ट्र विधानसभेवर निवडून गेल्या. त्यापैकी दोन उमेदवार काँग्रेस पक्षाच्या होत्या. याचा अर्थ तळकोकण विभागातून निवडून गेलेल्या एकूण महिला उमेदवारांपैकी ५० टक्के महिला उमेदवार ह्या काँग्रेस पक्षाच्या होत्या. काँग्रेस पक्षाबरोबरच जनता पक्ष ०१, जनता दल ०१, अखिल भारतीय हिंदू महासभा ०३, शिवसेना ०१, भाजपा ०१ या प्रमुख राजकीय पक्षांनी महिला नेतृत्वास उमेदवारी दिल्याचे दिसून येते. त्यापैकी जनता पक्ष व भाजपा या राजकीय पक्षांच्या माध्यमातून प्रत्येकी ०१ महिला उमेदवार विजयी झाल्याचे दिसून येते. तळकोकणामधून एकुण ०६ महिला उमेदवारांनी अपक्ष निवडणूक लढविली. परंतु एकाही अपक्ष महिला उमेदवारास विजय प्राप्त झाला नाही. या अपक्ष महिला उमेदवारांनी राजकीय पक्षांच्या अधिकृत उमेदवारांच्या विरोधात जाऊन निवडणुक लढविली. त्यामुळे त्यांनी राजकीय हस्तक्षेपाची केलेली कृती महत्त्वाची दिसते.

**तक्ता क्र.२**

**विधानसभा निवडणुकनिहाय तळकोकणातील महिला नेतृत्व**

| अ. क्र. | निवडणुक वर्ष | महिला नेतृत्व | विधानसभा मतदासंघ | पक्ष | निकाल |
|---|---|---|---|---|---|
| १ | १९६७ | लक्ष्मीबाई भुवड | संगमेश्वर | काँग्रेस | विजयी |
| २ | १८७२ | लक्ष्मीबाई भुवड | संगमेश्वर | काँग्रेस | विजयी |
| ३ | १९७८ | लक्ष्मीबाई भुवड | संगमेश्वर | काँग्रेस | पराभूत |
| ४ | १९७८ | कुसुमताई अभ्यंकर | रत्नागिरी | जनता पक्ष | विजयी |
| ५ | १९८० | कुसुमताई अभ्यंकर | रत्नागिरी | भाजपा | विजयी |
| ६ | १९८० | लक्ष्मीबाई भुवड | संगमेश्वर | काँग्रेस | पराभूत |
| ७ | १९९० | कमलाताई परुळेकर | देवगड | जनता दल | पराभूत |
| ८ | १९९० | विद्या बेलोसे | दापोली | काँग्रेस | पराभूत |
| ९ | १९९५ | आशा भोसले | खेड | काँग्रेस | पराभूत |
| १० | १९९५ | वर्षा पालव | सावंतवाडी | शिवसेना | पराभूत |
| ११ | १९९५ | सत्वशिलादेवी भोसले | सावंतवाडी | अपक्ष | पराभूत |
| १२ | १९९५ | कमलाताई परुळेकर | वेंगुर्ला | अपक्ष | पराभूत |
| १३ | १९९९ | सुचिता वेल्हाळ | गुहागर | अपक्ष | पराभूत |
| १४ | २००४ | कमलाताई परुळेकर | वेंगुर्ला | जनता दल | पराभूत |
| १५ | २००४ | नीता राणे | वेंगुर्ला | अपक्ष | पराभूत |
| १६ | २००४ | प्रमिला भारती | राजापूर | अ. भा. हिं. म. | पराभूत |
| १७ | २००४ | उषा गुहागरकर | खेड | अपक्ष | पराभूत |
| १८ | २००९ | प्रमिला भारती | राजापूर | अ. भा. हिं. म. | पराभूत |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १९ | २०१४ | रश्मी कदम | चिपळूण | काँग्रेस | पराभूत |
| २० | २०१४ | प्रमिला भारती | राजापूर | अ. भा. हिं. म. | पराभूत |
| २१ | २०१४ | स्नेहा केरकर | कुडाळ | अपक्ष | पराभूत |

स्त्रोत:www.eci.gov.in

तक्ता क्र. **२** वरुन असे दिसून येते कि, १९६७ ते २०१४ या कालावधीत संगमेश्वर, रत्नागिरी, देवगड, दापोली, सावंतवाडी, खेड, वेंगुर्ला, गुहागर, राजापूर, चिपळुण व कुडाळ या विधानसभा मतदारसंघांमधून महिला नेतृत्व निवडणूक रिंगणात उतरले. १९६७ च्या दुसऱ्या विधानसभा निवडणुकीमध्ये संगमेश्वर विधानसभा मतदारसंघामध्ये काँग्रेस पक्षाच्या माध्यमातून लक्ष्मीबाई भुवड या पहिल्या महिला राजकीय नेतृत्वाचा उदय झाला. १९७२ च्या विधानसभा निवडणुकीतही काँग्रेस पक्षाच्या माध्यमातून लक्ष्मीबाई भुवड यांनी संगमेश्वर विधानसभा मतदारसंघाचे नेतृत्व केले. त्यानंतर १९७८ व १९८० च्या विधानसभा निवडणुकीत काँग्रेस पक्षाच्या माध्यमातून निवडणुकीच्या रिंगणात उतरलेल्या लक्ष्मीबाई भुवड यांना पराभवास सामोरे जावे लागले. १९७८ व १९८० च्या विधानसभा निवडणुकीत अनुक्रमे जनता पक्ष व भाजपा पक्षाच्या माध्यमातुन कुसुमताई अभ्यंकर या महिला नेतृत्वाने रत्नागिरी विधानसभा मतदारसंघाचे नेतृत्व केले. १९६२ ते १९८० या कालावधीत तळकोकणाच्या विधानसभा निवडणुकीच्या राजकारणात लक्ष्मीबाई भुवड व कुसुमताई अभ्यंकर या केवळ दोन महिला नेतृत्वांचा उदय झाल्याचे दिसून येते. हे महिला नेतृत्व काँगेस, जनता पक्ष आणि भाजपा या प्रमुख राजकीय पक्षांच्या माध्यमातून पुढे आल्याचे दिसून येते.

१९९० नंतर तळकोकणामध्ये विधानसभा निवडणुकीच्या माध्यमातून अकरा महिला नेतृत्वांनी राजकीय प्रक्रियेत सहभाग नोंदविला. यामध्ये विद्या बेलोसे, आशा भोसले व रश्मी कदम या महिला नेतृत्वांना काँग्रेस पक्षाने राजकीय समावेशनाची संधी प्राप्त करून दिली. कमलाताई परूळेकर या महिला नेतृत्वास जनता दलाने, तर वर्षा पालव या महिला नेतृत्वास शिवसेना पक्षाने राजकिय समावेशनाची संधी प्राप्त करुन दिली. १९९० नंतर प्रथमच महिला नेतृत्वांनी प्रमुख राजकीय पक्षांच्या उमेदवारास आव्हान दिल्याचे दिसून येते. यामध्ये सत्वशिलादेवी भोसले, सुचिता वेल्हाळ, निता राणे, उषा गुहागरकर आणि स्नेहा केरकर या अपक्ष महिला नेतृत्वांनी प्रमुख राजकिय पक्षांच्या विरोधात जाऊन, राजकीय पक्षांच्या अधिकृत उमेदवारांच्या विरोधात निवडणूक लढविल्याचे दिसून येते. १९९० नंतर तळकोकणाच्या विधानसभा निवडणुकीच्या राजकारणामध्ये काँग्रेस, शिवसेना, जनता दल, अखिल भारतीय हिंदु महासभा या प्रमुख राजकीय पक्षांसह अपक्षांच्या माध्यमातून महिला नेतृत्वास राजकीय समावेशनाची संधी प्राप्त झाली. परंतु १९९० नंतर राजकीय प्रक्रियेत आलेल्या एकूण अकरा महिला उमेदवारांपैकी एकाही महिला उमेदवारास विधानसभा निवडणुकीमध्ये विजय प्राप्त करता आलेला नाही.

**तळकोकणातील महिला नेतृत्वाची चिकित्सा**

महाराष्ट्र राज्याच्या पहिल्या विधानसभा निवडणुकीपासून २०१४ च्या विधानसभा निवडणुकीपर्यंत तळकोकणामध्ये विधानसभा निवडणुकीच्या माध्यमातून महिला नेतृत्वास राजकीय क्षेत्रातून वगळण्याची प्रक्रिया घडून आलेली दिसते. स्थानिक शासनसंस्थांमध्ये महिलांना आरक्षण असल्याने तेथे महिला नेतृत्वाच्या राजकीय समावेशनाची प्रक्रिया घडून येताना दिसते. परंतु विधानसभा पातळीवरती महिला नेतृत्वास वगळण्याची प्रक्रिया घडल्याचे दिसून येते. राजकीय वगळण्याची प्रक्रिया हि संकल्पना एखादया विशिष्ठ समुहास जाणिवपुर्वक राजकीय प्रक्रियेत समाविष्ठ किंवा अंतर्भुत न करण्याशी संबंधित आहे. या संकल्पनेत महिलांच्या राजकीय, आर्थिक व सामाजिक या विविध विभागांचा आंर्तभाव होतो. मुलत: महिलांना राजकीय कृतीमध्ये सहभाग घेण्यास समाजाने नाकारलेले असते किंवा महिला समुहाचा सहभाग जाणिवपुर्वक मर्यादित केलेला असतो. महिला समुहाच्या संदर्भात असे दिसते कि, समाजाच्या सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक, कृषी, औद्योगिक व आर्थिक या सर्व क्षेत्रावर प्रभाव टाकणाऱ्या आणि या सर्व क्षेत्रांना स्पर्श करणाऱ्या महिला नेतृत्वास समाजाची अधिमान्यता नसल्याचे दिसून येते. लिंगभेद या प्रक्रियेमध्ये महिला समुहाचे व्यवस्थितपणे हितंसबंधात्मक नुकसान केले गेले आहे. संरचनात्मक आणि पितृसत्ताक या वैचारिक बळाच्या संयोगातून तळकोकणाच्या राजकारणात महिला नेतृत्वास राजकीय प्रक्रियेतून वगळण्याची प्रक्रिया घडल्याची दिसून येते.

तळकोकणामध्ये विधानसभा निवडणुकीच्या राजकारणात महिला नेतृत्वाचे असणारे अत्यल्प प्रमाण हे तळकोकणातील जात व स्त्री–पुरुष विषमतेचे वास्तव दर्शविते. तळकोकणात पुरुष मतदारांपेक्षा महिला मतदारांची संख्या अधिक व लक्षणीय असतानादेखील तळकोकणामध्ये महिला नेतृत्वामध्ये पुरेशी वाढ झालेली नाही. तळकोकणातील पक्षीय निवडणुका व निवडणुकींच्या माध्यमातून मिळणाऱ्या सत्तेच्या वर्तुळामध्ये महिलांचा असणारा अत्यल्प सहभाग ही बाब चिंतेची आहे. त्याचबरोबर निवडून आलेल्या महिला नेतृत्वांची कौटुंबिक, सामाजिक व राजकीय पार्श्वभूमी अभ्यासून महिला नेतृत्वाचे जात, वर्ग व पितृसत्ता या अंगाने स्त्रीकेंद्री राजकीय विश्लेषण केल्यास असे दिसून येते की, विधानसभेत निवडून आलेले महिला नेतृत्व हे त्या महिला नेतृत्वाच्या प्रस्थापित कुटूंबसंस्थेच्या दृढीकरणाची व राजकीय सत्ता पुरुष नियंत्रणाखाली चालवण्याची हमी देणाऱ्या आहेत. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर भारतीय राज्यघटनेने महिलांना पुरुषांच्याबरोबरीने समान राजकीय हक्क व अधिकार बहाल केलेले

आहेत. परंतु असे असले तरीही प्रस्थापित पुरुषसत्ताक समाजव्यवस्थेने व सर्व पक्षीय नेतृत्वांनी महिला हा घटक राजकीय क्षेत्रात स्वयंभूपणे प्रभावी व प्रभुत्वशाली होणार नाही याची पुरेपुर काळजी घेतलेली आहे.

**समारोप**

तळकोकणामध्ये नेतृत्वाची वाढ होण्यास सुरूवात झालेली आहे. तळकोकणातील स्थानिक हितसंबंधांचा दावा १९९० नंतर केला जात आहे. तसेच तळकोकणातील समाज त्यांचे नेतृत्व म्हणून स्थानिक नेतृत्वांकडे पाहत आहे. विशेषत: उच्च जाती व मराठा नेतृत्वांबरोबरच कुणबी, भंडारी अशा ओबीसी जातीसमूहातील नेतृत्व राजकारणात यशस्वी होत चालले आहे. त्यामुळे काँग्रेस, शिवसेना, भाजप, राष्ट्रवादी काँग्रेस या पक्षांनी तळकोकणामध्ये आपल्या पक्षाचा चेहरा मराठा बरोबरच ओबीसी केंद्रीत ठेवलेला दिसून येतो. याबरोबरच मुस्लिम राजकारण देखील तळकोकणामध्ये १९९० नंतर फार घडत नाही. तळकोकणामध्ये विधानसभा पातळीवर महिला नेतृत्वास राजकीय हक्क, राजकीय सहभाग आणि राजकीय प्रतिनिधीत्वाची संधी नाकारलेली दिसते. सदर विभागातील विधानसभा निवडणुकीच्या राजकारणामध्ये महिला नेतृत्व आणि पुरुष नेतृत्वाच्या प्रतिनिधीत्वामध्ये मोठे अंतर आहे. याचा अर्थ तळकोकण विभागातील राजकीय क्षेत्र पुरुष वर्चस्वाचे हितसंबंध जोपासत असून, हे राजकीय वर्चस्व पुरुषांच्या पितृसत्ताक, सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक व शैक्षणिक प्रभुत्वाचे प्रतिबिंब आहे. असेही या माहिती संकलनातून स्पष्ट होते.

**संदर्भ सूची**


१. भारत लोकसभा निवडणूक अहवाल २००४.
२. भारत लोकसभा निवडणूक अहवाल २००९.
३. भारत लोकसभा निवडणूक अहवाल २०१४
४. पवार वैशाली, 'महिलांच्या सत्तासंघर्षाचा आलेख', डायमंड प्रकाशन पुणे, मार्च २०१.
५. जैन अशोक, 'महाराष्ट्राचे शासन आणि राजकारण', शेट प्रकाशन, मुंबई, ऑक्टोबर, १९९८.
६. सोमण शैला, 'महाराष्ट्रातील राजकीय प्रक्रिया', प्राची प्रकाशन, मुंबई, सप्टेंबर १९९९.
७. पळशीकर सुहास, 'जात व महाराष्ट्रातील सत्ताकारण', सुगावा प्रकाशन, पुणे, एप्रिल, २००३
८.पवार प्रकाश, 'काँग्रेसपुढील आव्हाने आणि भाजपचा उदय', २०१६.
९. पळशीकर सुहास, सुहास कुलकर्णी, 'महाराष्ट्रातील सतासंघर्ष राजकीय पक्षांची वाटचाल', २०१०.